# विनोबा भावे व महात्मा गांधी यांचे महिला सबलीकरणाविषयी विचार

**प्रा. डॉ. सुषमा देशपांडे**
इतिहास विभागप्रमुख,
डॉ. सौ. इं. भा. पाठक महिला महाविद्यालय, औरंगाबाद.

एक विधायक दृष्टीचे समाज सुधारक व मानवतेची प्रतिष्ठा जपणारे मानवता हा त्यांच्या तत्त्वविचारांचा केंद्रबिंदू असणारे आधुनिक संत म्हणून महात्मा गांधीजीचे नाव भारतीय इतिहासात अजरामर झालेले आहे. सत्ता विभागणी, निर्णय प्रक्रिया व सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवनात समान सहभाग अशा महिला सबलीकरणाच्या पार्श्वभूमीवर गांधीजींनी म्हटले की स्त्रीलाही पुरुशांच्या बरोबरीने समाजात हक्काचे स्थान मिळायला हवे. ज्या स्वराज्यात स्त्री व पुरुशांना समान स्थान नाही ते स्वराज्यच नव्हे असे ते म्हणत. 'समान भौतिक पात्रता असणारा पुरुशाचा जोडीदार ही स्त्रीची भूमिका' गांधीजींना अपेक्षित होती. स्त्रीला पुरुशांएवढीच मानसिक शक्तीची देणगी मिळालेली आहे. त्यामुळे अहिंसक लढा देण्यास तीच अधिक कार्यक्षम व लायक आहे असे ते म्हणत. म्हणूनच त्यांनी स्त्रियांना राजकारणात व आपल्या चळवळीत सहभागी करुन घेतले.

स्त्रियांमधील आंतरिक शक्तीला ओळखून गांधीजींनी महिलांच्या शिक्षणावरही अधिक भर दिला. एक पुरुश शिक्षण मिळाल्यास सुशिक्षित होईल, पण एक स्त्री शिकल्यास एक कुटुंब सुशिक्षित होईल. कारण लहान मुलांवर संस्कार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य स्त्री करते. महात्मा गांधीजींनी महिलांमध्ये स्वाभिमान, स्वावलंबन, राष्ट्रीय भावना, विश्वास नेतृत्व भावना जागृत करण्याचे कार्य केले. स्त्रियांमध्ये निःस्वार्थी सेवाभाव, स्वार्थत्याग, सोषिकता, सहन शक्ती, नम्रता हे गुण निसर्गतःच आहे. त्यामुळे पुरुषांच्या तुलनेत स्त्री ही अधिक थोर ठरते. स्त्री ही त्याग, श्रद्धा, आत्मबलिदान, ज्ञानाचे मूर्तिमंत उदाहरण आहे असे गांधीजींचे मत होते.

गांधीजींनी आपल्या आश्रमातही स्त्री–पुरुष समानतेचा आदर्श ठेवला होता. गांधीजींच्या मते इष्वराने स्त्री पुरूषांना परिपूर्ण बनविले आहे. निसर्ग प्रक्रियेत दोघेही समान आहेत. तसेच स्त्री व पुरुश हे परस्परांस पूरक आहेत. भारतीय धर्म व संस्कृती ती स्त्रियांनीच टिकविली आहे. भारतीय स्त्रियांनी सीता, दमयंती, द्रौपदी यांचे आदर्श समोर ठेवून कठिण प्रसंगी निर्णायक वृत्ती ठेवावी व स्वतःची आणि समाजाची नैतिक पातळी उंचवावी व आजच्या समाजाचे नेतृत्व करावे.

गांधीजींच्या प्रेरणेनेच भारतीय राजकारणात कस्तुरबा गांधी, विजयालक्ष्मी पंडित, डॉ. सुशीला नायर, अरुणा असफअली अशी स्त्री रत्ने स्वयंतेजाने तळपूण गेली व गांधीजींच्या चळवळीत या स्त्रियांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. आपल्या पत्नीच्या स्वभावावरुन समस्त स्त्री वर्गाच्या स्वभावाचा आपण अभ्यास केला असता असे आढळून आले की, स्त्रियांमधील असलेल्या आत्मभानाद्वारे संपूर्ण देशाचा कायापालट करतील. म्हणून त्यांनी नेहमी स्त्री जागृतीवर भर दिला. कायद्याने समान दर्जा व मतदानाचा अधिकार स्त्रियांना मिळालाच पाहिजे तसेच आर्थिक दृष्टीनेही स्त्री स्वयंपूर्ण व्हावी म्हणून पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना आर्थिक अधिकार असावेत. आर्थिक क्षेत्रात अधिकार नसल्यामुळे पुरुशांनी स्त्रियांवर आजवर वर्चस्व गाजविले. पुरुशी अत्याचाराला उत्तर देण्यासाठी शिक्षण व शिक्षणातून आर्थिक दृष्टीने संपन्नता स्त्रियांमध्ये येईल. म्हणून ते स्त्रियांना उपयुक्त शिक्षण मिळायलाच हवे. त्याशिवाय त्यांना प्राप्त झालेले नैसर्गिक अधिकारही त्या उपभोगू शकरणार नाही. स्वतःचे रक्षण करु शकणार नाही. म्हणून त्यांनी नेहमीच स्त्री शिक्षणाची अपरिहार्यता विशद केली, पण स्त्रियांनी पुरुषांची नक्कल करु नये व पुरुषांशी स्पर्धाही करु नये. स्त्री पुरुश परस्परांना पुरक आहेत. स्त्रियांनी स्वतः शिक्षण घेवून सुशिक्षित होवून परस्परांना, परस्परांच्या प्रगतीचा फायदा करुन द्यावा.

गांधीजींनी भारतीय समाजातील पडदा पद्धतीवरही टीका केली. ही पद्धत त्यांना स्त्रियांवर अत्याचाराचे द्योतक वाटत होती. त्यामुळे त्यांनी ही एक रानटी प्रथा असून तीचा त्याग करावा असे ते म्हणत. एकूण महिला सबलीकरणाच्या संदर्भात गांधीजींनी स्त्री शक्तीचे मोठेपण ओळखले होते. स्त्रियांमध्ये सहनशक्ती, सोशिकता या गुणांबरोबर श्रद्धा, ज्ञान आहे व या ज्ञानाची ओळख गांधीजींनी स्त्रियांना करुन दिली व या शक्तीद्वारे स्त्रियांनी आपले स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण करावे. स्त्रियांना योग्य संधी मिळाल्यास त्या संधीचे सोने करण्याचे सामर्थ्य आहे. म्हणूनच गांधीजीनी आपल्या स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांना नेतृत्वाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या व म्हणूनच महिला सक्षमीकरणात गांधी विचारांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्त्रियांच्या मनातील अनामिक भीती दूर करुन त्यांना समाजाच्या सर्व प्रवाहात सामील करुन घेणे गरजेचे आहे असा त्यांचा ठाम विष्वास होता. गांधीजींच्या योगदानामुळेच व प्रयत्नामुळेच भारतीय स्त्री स्वहक्काबाबत जागृत झाली व भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनात तिची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली.

महिला सबलीकरणासंदर्भात विनोबा भावे यांचे ही नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. विनोबाजींच्या आश्रमात स्त्रियांनाही पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण दिले जात असे. कारण बालकांचे शिक्षण स्त्रियांशिवाय होवूच

शकत नाही. यावर त्याचा विश्वास होता. स्त्रीपुरुष भेद नष्ट करुन स्त्रियांना सामाजिक, कौटुंबिक, राजकीय अधिकार मिळावेत. समाजाच्या रक्षणासाठी स्त्रियांनी प्रयत्न करावेत, स्त्रियांनी कुठल्याही कामात पुरुशांवर अवलंबून न राहता आत्मविश्वासाने प्रत्येक कार्य करावे. स्त्रियांना पुरुशांच्या बरोबरीने अधिकार मिळावेत, पण हे अधिकार स्त्रियांनी स्वतः प्राप्त करावेत व अशा प्रकारे स्त्रियांनी समाजाला बदलण्याचे कार्य करावे. स्त्रियांनी सार्वजनिक जीवनात काम करावे, पण पुरुषांचे अनुकरण करु नये, तर स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करावे. स्त्रियांमध्ये समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, यांच्याविरुद्ध लढण्याची शक्ती असल्यामुळे त्यांच्या शिक्षणाचे महत्त्वही विनोबा भावे अधोरेखित करतात. विनोबा भावे स्त्री पुरुश समानतेचे पुरस्कर्ते होते. पुरुशाप्रमाणेच स्त्रियांना ही सामाजिक, राजकीय, कौटुंबिक अधिकार व कर्तव्य आहेत.

स्त्री शक्तीचा उपयोग हा अहिंसा, सेवा, सर्वोदय, शांती रक्षणासाठी व्हावा. तसेच स्त्रियांनी उद्योगी व स्वावलंबी व्हावे असे ते म्हणत. स्त्री ही उपभोगाचे साधन नाही तर परमेष्वराचे सृजन आहे, पूजा आहे असे ते मानत. स्त्रियांनी अखंड ज्ञानसाधना करुन समाजाचे मार्गदर्शन करावे. नैतिक आचरण व ब्रह्मविद्येच्या निष्ठेने तिने सिंहासारखी गर्जना करावी व समाजाला प्रभावित करावे. स्त्रियांनी पुरुषांची सेवा करावी हे विनोबाजींना मान्य नव्हते. उलट स्त्री स्वातंत्र्याचे त्यांनी नेहमीच समर्थन केले होते, विवाहाचा निर्णय स्त्रीने स्वतः घ्यावा. केवळ आईवडिलांच्या आनंदासाठी तिने त्यांच्या पसंतीने विवाह करु नये. स्त्रियांना अबला म्हणनेही त्यांना मान्य नव्हते. विनोबाजी स्त्रियांना सबला म्हणत व तिने स्वतःचे रक्षण स्वतःच करावे असे ते मानत व त्यासाठी त्यांनी पडदा पद्धतीलाही विरोध केला होता. त्यांनी अनेक स्त्रियांचे आश्रम सुरु केले. तसेच अनेक स्त्रियांची संमेलनेही आयोजित केली. ते स्त्रियांना प्रथम व श्रेष्ठ गुरु मानत असत. यावरुन आपल्याला विनोबाजींच्या विचारात स्त्रियांचे उच्च स्थान अर्थात् महिला सबलीकरणाबाबत त्यांचा दृष्टीकोण लक्षात येतो.

### *संदर्भ सूची :*

1. *विनोबा, स्त्री शक्ती, परमधाम प्रकाशन, पवनार, 1999*
2. *विनोबा, नारी का महिमा, सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी 1992*
3. *विनोबा, सप्तशती, परमधाम प्रकाशन, पवनार, 2000*
4. *आचार्य विनोबा भावे, टंडण विष्वनाथ, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, दिल्ली 1997*
5. *नारियों के नेता और षिक्षक, कृपलानी सुचेता, साहित्य प्रकाशन वाराणसी, 1969*
6. *समाजसुधार : समस्याएँ और समाधान, गांधी साहित्य प्रकाशन, इलाहाबाद, सुमन श्री रामनाथ, 1969*
7. *भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, डॉ. अनिल कटारे, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद*
8. *गांधी–पंडित नलिनी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, 1683*
9. *गांधी विचार दर्शन खंड – 1, गांधी वाङ्मय प्रकाशन समिती, महाराष्ट्र, 1969*